पहिली खबर
FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station मा.पो.नि. पहिली खबर क्र. FIR No. 34 वर्ष Year 2024 दिनांक Date १८/११/२०

2. (i) अधिनियम Act अफरातफर प्रतिबंध अधि. (कलमे Sections 10
(ii) अधिनियम Act १९६२ कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ४/११/२४ तारीख पासून Date from वेळ Time तारीख पर्यंत Date to १८/११/२४ घळ Time १६.००

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.०
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०४/११/२०२४ वेळ Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ३३/२४ तारीख Date १८/११/२०२४ वेळ Time २३.२० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b). गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name नगरक सहकारी संस्था ई विभाग ठिकाणाचे नंबर No. if any गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road पूना स्ट्रीट

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place मरोळ नाका गाव Village मुंबई पोस्ट Post तालुका Taluka जिल्हा Dist. राज्य State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station तालुका Taluka जिल्हा Dist. राज्य State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name प्रमोद प्रकाश सुर्वे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name प्रकाश सुर्वे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No.

(e) पारपत्र क्रमांक Passport No. दिल्याचा दिनांक Date of issue दिल्याचे ठिकाण Place of Issue (f) व्यवसाय Occupation

(g) धर्म Religion हिंदू जात Caste मराठा जनजात Sub-Caste

(h) पत्ता Address मा.पो.नि. मुंबई गल्ली/सर्व्हे नं. Ward घर/नाव नं. House Name No. फोन/मो. नं. Phone No. पॅन नं. Pan No. वोटर्स नं. Card No.

रस्त्याचे नाव Road जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place गाव Village पोस्ट Post पो. स्टे. P. Stn.

तालुका Taluka जिल्हा Dist. राज्य State सध्याचा पत्ता Present Address खरी नक्कल

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदा प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on f 1-B of attach FIR 1-B to case diary.)

पोलीस निरीक्षक
सहायक पोलीस निरीक्षक

मृतदेह कर्मचारी सानप, वय पूर्ण वर्षे, होता नोकरी (सहायक निबंधक, सहक
संस्था) ई विभाग, मुंबई रा. बि-स्टल पार्क, फ्लॅट नंबर २८४, बिल्डिंग नं. ४,
सेक्टर २१, नेरुळ, नवी मुंबई.

तक्रारदार यांची जबाब स्वंतत्र कागदावर टंकलिखीत करण्यात आला असुन तोच प्रत्यक्ष खबरी जबाब समजण्यात यावा.

समक्ष
(सागर आरगडे)
पोलीस निरीक्षक
ला-पू-वि मुंबई

PI प्रमोद दुबे.

खरी नक्कल

पोलीस निरीक्षक
[illegible] प्रतिबंधक विभाग, मुंबई

फिर्याद दिनांक १८/११/२०२६

मी, प्रमोद प्रकाश सुर्वे, वय ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक),नेमणुक– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई, मो.क्र.९७६७५३१९४७

मी वरील प्रमाणे असून, मी दिनांक ११/०७/२०२३ रोजी पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे 'पोलीस निरीक्षक ' या पदावर नेमणूकीस आहे.

मी दिनांक ०४/११/२०२६ रोजी कर्तव्यावर असताना, मला व सहायक पोलीस आयुक्त श्री महेश जाधव यांना मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांनी एका तक्रारदाराची पडताळणी कारवाई करण्याचे आदेशीत केले. त्यावरुन माझी तपासी अधिकारी व स.पो.आ.महेश जाधव यांची पर्यवेक्षक अधिकारी म्हणुन लेखी आदेश केल्याने नमुद पडताळणी क्र.७८/२६मधील तक्रारदार श्री संजय रमेश सिंव्हल, वय– ६२ वर्ष यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली, त्यांनी त्यांना मराठी वाचता येते परंतु लिहिता येत नसल्याने त्यांचा तक्रारअर्ज इंग्रजीमध्ये टंकलिखित करुन तो अर्ज आम्हास वाचण्यास दिला. त्यांच्या तक्रारीची हकीकत अशी की,

तक्रारदार श्री संजय रमेश सिंव्हल, वय– ६२ वर्ष, व्यवसाय– ॲडव्होकेट, राहणार एफ–६०४, जलवायू विहार, पवई, मुंबई ४०००७६ यांचे V-HAL LAW ASSOCIATES या नावाचे कार्यालय पवई येथे आहे. तक्रारदार हे पेशाने वकील असून त्यांचा बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲंड गोवा रजि. नं. एमएएच/२४३४/२०२० असा आहे.

तक्रारदार यांच्या अशील श्रीमती रोअन्ना सी. लेविस यांनी माझगांव किशांत को.ऑप हौसिंग सोसायटी, २ री गनपावडर रोड, माझगाव, मुंबई या सोसायटीमध्ये मानीव सभासदत्व (Deemed Membership) मिळणेकरीता महाराष्ट्र को.ऑप सोसायटीज ॲक्ट १९६० कलम २२(२) अन्वये अपील दाखल करण्याकरीता दिनांक ०९/०९/२०२६ रोजी तक्रारदार यांना वकीलपत्र दिले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दिनांक १०/०९/२०२६ रोजी सहाय्यक निबंधक, ई विभाग, मुंबई यांच्या कार्यालयात अपिल दाखल केले.

तक्रारदार यांनी दाखल केलेल्या अपीलाच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, मुंबई यांच्या कार्यालयातून दिनांक २१/१०/२०२६ रोजी सहाय्यक निबंधक, ई विभाग, ५ वा मजला, भोरुका चॅरिटेबल ट्रस्ट, ट्रान्सपोर्ट हाऊस, पुना स्ट्रिट, मस्जिद बंदर, मुंबई यांच्या कार्यालयात अपिल क्र.१७/२०२६च्या सुनावणी कामी उपस्थित राहण्याबाबत दिनांक १४/१०/२०२६ रोजीचे नोटिस प्राप्त झाले.

तक्रारदार यांना प्राप्त नोटीसच्या अनुषंगाने तक्रारदार स्वत: व सोसायटीचे व्यवस्थापक हे दिनांक २१/१०/२०२६ रोजीच्या सुनावणीकामी श्री. प्रदीप सानप, सहाय्यक निबंधक, ई विभाग, मुंबई यांच्यासमक्ष उपस्थित होते. नमुद सुनावणी संपल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे अपिलाची प्रत सोसायटीचे व्यवस्थापक यांना दिली. सदर अपीलावर म्हणणे सादर करण्याची पुढील तारीख दिनांक २८/१०/२०२६ अशी होती. दिनांक २१/१०/२०२६ रोजीची सुनावणी संपल्यानंतर सोसायटीचे व्यवस्थापक तेथून निघून गेल्यानंतर श्री. प्रदीप सानप यांनी तक्रारदार यांना तेथेच थांबण्याबाबत सांगितले. तदनंतर श्री. सानप यांनी तक्रारदार यांचकडे त्यांच्या व्यवसायाबाबत विचारपुस करुन तक्रारदार यांचे अशीलाच्या अपीलावर जलद सुनावणी होवून तक्रारदार यांच्या बाजूने निकाल देण्याकरीता पैसे द्यावे लागतील असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांच्या अशीलाची बाजू भक्कम असून त्याआधारे त्यांच्या बाजूने निकाल होईल असे सांगताच श्री. सानप यांनी निकालाकरीता जास्त वेळ लागू शकतो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार श्री. सानप यांच्या कार्यालयातून निघून गेले.

खरा नकल

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Pramod PI प्रमोद सुर्वे

दिनांक २८/१०/२०२६ रोजी सुनावणीकरीता तक्रारदार हे श्री. सानप यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले असताना सोसायटीचे व्यवस्थापक यांनी सदर अपीलावर त्यांचे म्हणणे सादर केले होते. त्यावर तक्रारदार यांनी त्यांचे अशील यांची बाजू मांडली, परंतु श्री. सानप यांनी अपीलकर्त्यांनी पुन्हा दिनांक १८/११/२०२६ रोजी त्यांचे म्हणणे सादर करणेबाबत रोजनाम्यावर आदेश पारित केले. त्यावर तक्रारदार यांनी विरोध दर्शविला, परंतु श्री. सानप यांनी त्यांची बाजू ऐकून न घेता पुन्हा म्हणणे सादर करणेबाबत आदेश दिले. त्यानंतर श्री. सानप यांनी सोसायटीचे व्यवस्थापक यांना निघून जाण्याबाबत सांगून तक्रारदार यांना थांबण्यास सांगितले. त्यावेळी श्री. सानप यांनी अपीलावर जलद निर्णय देण्याकरीता पैसे द्यावेच लागतील असे सांगितल्यावर तक्रारदार यांनी श्री. सानप यांना त्यांची अपेक्षित रक्कम किती आहे? याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांचेसोबत त्यांचा पहिलाच व्यवहार असल्याने सदर अपीलावरील निर्णयाकरीता रु.५०,०००/— रक्कम दिनांक ०४/११/२०२६ रोजी घेवून येणेबाबत सांगितले. सदर रक्कम दिनांक ०४/११/ २०२६ रोजी प्राप्त होताच दिनांक १८/११/२०२६ रोजीच्या सुनावणी दरम्यान तक्रारदार यांच्या बाजूने निकाल देणार असल्याचे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी सदरबाबत त्यांचे अशील यांना माहिती देवून श्री. सानप यांना कळवत असल्याचे सांगितले.

तक्रारदार यांनी श्री. सानप यांचे म्हणणे त्यांच्या अशील यांना सांगितल्यावर त्यांच्या अशील यांनी श्री. सानप यांना लाचेची रक्कम देण्यास नकार दिला. त्यावर तक्रारदार यांनी त्यांच्या अशील श्रीमती लेविस यांस सदरची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे देत असलेबाबत सुचित केले. तक्रारदार यांच्या अशील श्रीमती लेविस यांनी त्यास होकार दिल्याने तक्रारदार यांनी दिनांक ०४/११/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष येवून लोकसेवक हे तक्रारदार यांचे अपिलावर जलदगतीने सुनावणी करुन त्यांच्या बाजूने निकाल देण्याकरीता लाचेची मागणी करत असल्याबाबत आशयाची तक्रार इंग्रजीमध्ये टंकलिखित करुन सादर केली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०४/११/२०२६ रोजी दोन शासकीय पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तक्रारदार व लोकसेवक यांच्या समक्ष भेटीमध्ये लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली रक्कम रु.५०,०००/— तडजोडीअंती कमी करुन रु.३०,०००/— स्विकारणेस होकार देवून सदरची रक्कम हि दिनांक १८/११/२०२६ रोजीच्या सुनावणीवेळी घेवून येणेबाबत सांगितले. वरील तक्रारदार व लोकसेवक यांचे प्रत्यक्ष भेटीदरम्यान झालेले संभाषण आम्ही व पंचांनी ऐकल्यानंतर लोकसेवक श्री. प्रदीप सानप यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही दिनांक १८/११/२०२६ रोजी घेवुन येण्यास सांगितले त्यामुळे पुढील सापळा कारवाई ही दिनांक १८/११/२०२६ रोजी करण्याचे ठरले.

आज दिनांक १८/११/२०२६ रोजी सकाळी तक्रारदार व पंच ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात आल्यानंतर सपोआ महेश जाधव हे रजेवर असल्या कारणाने मा.वरिष्ठांच्या लेखी आदेशानुसार सपोआ श्री. मुदिराज हे पर्यवेक्षक म्हणून काम पाहत असल्याचे सांगण्यात आले. मी व सपोआ मुदीराज यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. तद्नंतर मी, तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांना सदरची रक्कम रु. ३०,०००/— त्यांच्या अशील श्रीमती रोआना सी. लेविस यांनी दिलेली असल्याचे सांगितले. त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदार यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडील लाचेची रक्कम रू. ३०,०००/— (त्यामध्ये भारतीय चलनातील रू.५००/— दराच्या ६० नोटा) यांच्या झेरॉक्स काढून त्यावर दोन्ही शासकीय पंचांची स्वाक्षरी घेण्यात आल्या. तसेच तक्रारदार यांची अंगझडती घेण्यात आली.

खरी नक्कल

निरीक्षक

त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील गोपनीय कक्षामध्ये सापळापुर्व कारवाई करण्यात आली. त्यावेळी मी व पोलीस पथकातील पोशिचा क्रमांक २१६३९५/ साबळे यांसी पंच व तक्रारदार यांना ॲथ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले. पोशि चालक साबळे याचेमार्फतीने लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रू.३०,०००/— रक्कमेच्या भारतीय चलनातील रु. ५००/- दराच्या ६० नोटा अशी लाचेची रक्कम एकत्रित करून नमुद रक्कमेस ॲथ्रोसिन पावडर लावून लाचेची रक्कम सफेद रंगाच्या पाकीटामध्ये आत ठेवुन पाकीटावर देखील ॲथ्रोसिन पावडर लावली व लाच रक्कमेचे सफेद रंगाचे पाकीट तक्रारदार यांच्याकडील काळया रंगाच्या सॅग बॅगमध्ये अलगद ठेवले. त्यानंतर मी पंच व तक्रारदार यांना पोशि चालक साबळे हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व पंच व सापळा पथकातील अंमलदार यांना खबरदारीच्या योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही ला.प्र.वि. मुंबई ठाणे दैनंदिनीमध्ये नोंद घेवुन सापळा कारवाईकरीता पथकासह शासकीय वाहनाने रवाना झालो. तदनंतर मस्जिद बंदर येथील सोलापूर स्ट्रिट येथे रस्त्याच्या कडेला कोणासही संशय येणार नाही अशारितीने ठरावीक अंतरावर थांबविण्यात आली. तेथून मी, सपोआ मुदिराज, सापळा पथक व पंच असे पायी चालत भोरुका चॅरिटेबल ट्रस्ट इमारतीमध्ये कोणासही संशय येणार नाही अशारितीने लोकसेवक यांच्या कार्यालयाच्या जवळ थांबून राहिलो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांनी लोकसेवक यांची प्रत्यक्ष भेट घेवून लोकसेवक यांना लाचेची रक्कम दिली. लोकसेवक यांनी सदर लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी पुर्वनियोजीत ईशारा म्हणुन त्यांचे डोळयावरील चष्मा काढुन हातात धरला असा लोकसेवकाने लाच रक्कम स्विकारल्याबाबत पुर्वनियोजीत इशारा केला.

त्यानंतर मी व सापळा पथकाने लागलीच पंचांसह लोकसेवक श्री प्रदीप सानप यांना १६.०० वा लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. सदर लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री. प्रदीप कारभारी सानप, वय— ५२ वर्ष, व्यवसाय— नोकरी (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ई विभाग, मुंबई) राठी : स्टेला हाऊस, फ्लॅट नं.१३, प्लॉट नं.२०४, सेक्टर २१, नेरुळ, नवी मुंबई असे सांगितले.

तरी आरोपी लोकसेवक श्री. प्रदीप कारभारी सानप, वय— ५२ वर्ष, व्यवसाय— नोकरी (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ई विभाग, मुंबई) राठी : स्टेला हाऊस, फ्लॅट नं.१३, प्लॉट नं.२०४, सेक्टर २१, नेरुळ, नवी मुंबई यांनी स्वत: करीता तक्रारदार नामे श्री संजय रमेश सिल्व्हन यांचे अशीलाचे सोसायटीचे डीम मेंबरशीप अपीलावर जलदगतीने सुनावर्णी होवून तक्रारदार यांच्या अशीलाच्या बाजूने निकाल देण्याकरीता रू. ५०,०००/— इतकी लाचेची मागणी करून तडजोडीअंती रु.३०,०००/— स्वीकारण्याचे दिनांक ०४/११/२०२६ रोजीच्या पडताळणी मध्ये मान्य केले. तसेच दिनांक १८/११/२०२६ रोजी सापळा कारवाईदरम्यान लोकसेवक यांनी स्वत:करीता मागितलेली रू. ३०,०००/— इतकी लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारताना लोकसेवक यांना रंगेहाथ पकडले, म्हणुन माझे आलोसे श्री.प्रदीप कारभारी सानप यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठित टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(सागर आरगडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

PI प्रमोद सुर्वे

खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे .....

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.....

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य .....

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .....

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळ व ठिकाणी यातील तक्रारदार श्री संजय [illegible] त्यांस आरोपी यांना सोसायटीचे ऑफिस समोरील [illegible] दरवाजा केल्याचा जाब यातील नमूद तक्रारदार यांच्या [illegible] यांनी [illegible] आरोपी यांनी रु 40,000/- त्यापैकी [illegible] रु. 20,000/- त्यापैकी [illegible] तसेच [illegible] यातील नमूद आरोपी लोकसेवक यांचे विरोधात मा.प्र.वि मुंबई गुन्हा नं 24/

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या [illegible]

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोनि आनंद फिलसेवाड

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

.....

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ..... जिल्हा ..... राज्य .....

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ..... Rank ..... No. ..... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .....

(3) Transferred to P. S. .....
District ..... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

Rajesh PI प्रमोद सुर्वे

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ..... सागर आव्हाडे

पदनाम Rank ..... पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ..... मा.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I. O. .....

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख .....

1. Date and time of submitted to the Court.

प्रत Copy to	2 फिर्यादी, 2. Complainant,	3. पोलीस अधीक्षक (संगणक) 3. Supdt. of Police (Computer),	4. तपासिक अंमलदार, 4. Inv. Officer,	5. स्थळ प्रत. 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

खरी नकलकार

पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,